**प्रेसनोट दि.१२/०४/२०१९**

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वयोवृध्द इसमास नातेवाईकांचा शोध घेवुन नातेवाईकांचे ताब्यात सुखरुप देवुन केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत.

---

दि. १०/०४/२०१९ रोजी रात्री ०२.३० वा. सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना अभिरुची मार्शल कर्तव्यावर असणारे पोलीस कर्मचारी ८८५३ सागर कुंभार व पोलीस कर्मचारी ८८४५ सुनिल धुमाळ यांना पोलीस कंट्रोल रुम कडुन कॉल प्राप्त झाला. सदर कॉलचे कॉलर नामे निखील दांगट रा. भैरवनाथ मंदिरजवळ, वडगाव बुा. पुणे यांनी सांगीतले की, लोकमत प्रेसजवळ, लगडमळा, धायरी, पुणे या ठिकाणी एक ८० वर्षाचे वयोवृध्द ग्रहस्थ त्यांना त्यांचे राहते घराचा पत्ता विसरल्याने सांगता येत नाही. असा कॉल पोलीस कंट्रोल रुम येथुन प्राप्त होताच अभिरुची मार्शल कर्तव्यावर असणारे पोलीस कर्मचारी ८८५३ सागर कुंभार व पोलीस कर्मचारी ८८४५ सुनिल धुमाळ यांनी सदर ठिकाणी जावुन वयोवृध्द इसमास त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव सुंदरलाल ठाकुर असे सांगुन राहण्याचा पत्ता नांदेड गाव असा सांगीतला. त्यानंतर पोलीस कर्मचारी ८८५३ सागर कुंभार व पोलीस कर्मचारी ८८४५ सुनिल धुमाळ यांनी सदर वयोवृध्द इसमास घेवुन पोलीस कंट्रोल रुमची परवानगी घेवुन पुणे ग्रामीण हद्दीतील नांदेड गाव या ठिकाणी घेवुन जावुन तेथील सोसायटी मधील वॉचमन यांना सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर यांना दाखवुन त्यांचे राहते पत्त्याबाबत चौकशी केली. त्या ठिकाणी काहीएक उपयुक्त माहिती मिळुन येत नसल्याने पोलीस कर्मचारी ८८५३ सागर कुंभार व पोलीस कर्मचारी ८८४५ सुनिल धुमाळ यांनी सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर यांना नांदेड सिटी या ठिकाणी घेवुन जावुन त्या ठिकाणचे सोसायटी मधील वॉचमन लोकांकडे चौकशी केली असता सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर हे ललित डी बिल्डींगमध्ये राहवयास असल्याचे समजल्याने पोलीस कर्मचारी ८८५३ सागर कुंभार व पोलीस कर्मचारी ८८४५ सुनिल धुमाळ यांनी सदर बिल्डींगमधील फ्लॅट नं. १०४ या ठिकाणी जावुन पहाटे ०४.३० वा. चे सुमारास सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर यांचा मुलगा नामे आक्लेश सुंदरलाल ठाकुर याची भेट घेवुन सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर हे त्यांचे वडील असल्याची खात्री झाल्याने त्यांना त्यांचा मुलगा नामे आक्लेश सुंदरलाल ठाकुर यांच्या ताब्यात सुखरुप दिल्याने पोलीसांनी तात्काळ केलेल्या सहकार्यामुळे सदर वयोवृध्द इसम नामे सुंदरलाल ठाकुर यांचे नातेवाईकांनी पोलीसांचे मनपुर्वक आभार व्यक्त केले आहेत.

